नियमित दिवाणी दावा क्रं. ५३३/२०१२
निशाणी क्रमांक - /क सोबत

<u>वादी यांचा पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. खंजीरे यांचे मार्फत शपथेवर सुरु-</u>

हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५३३ या मिळकतीच्या मालकी व वहीवाटीशी माझा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५९२ ही धनपाल, जयपाल, बाबासो यांच्या मालकीची होती. गट क्र. ५९२ चा सही शिक्याचा नकाशा हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी या कामामध्ये आप्पासो व जयपाल यांना पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५९२ मध्ये धनपाल व बाबासो यांनी स्वतःच्या खर्चाने पाईपलाईन केलेली नाही. मी प्रतिवादी क्र. १ व २ यांची कैफीयत वाचलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ५९२ मधील पाईपलाईन कल्लाप्पाण्णा गाट यांच्या मालकीची आहे. हे मला माहिती नाही की, मौजे हुपरी येथे गट क्र. ३७४अ, ५७४, ६०३, ३७५ व इतर अशा मिळकती कल्लाप्पा गाट यांच्या मालकीच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कल्लाप्पा गाट यांनी दि. १८/०६/२०१२ रोजीची कोल्हापूर पाटबंधारे विभागाची गट क्र. ५९२ मध्ये १५ एच. पी. चे उपसा यंत्र बसविण्याची परवानगी घेतली आहे तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून १५ एच. पी. चे उपसायंत्र बसविण्याची परवानगी घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, कल्लाप्पा गाट यांनी पाईपलाईन केल्यानंतर मी पाटबंधारे विभागाकडे तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पाईपलाईन व विद्युतसंच आज देखील चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५९१ चा समजूतीचा नकाशा दाव्यामध्ये दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५९२ च्या पश्चिम बाजूला गट क्र. ५९३ त्याच्या पश्चिमेस गट क्र. ५९४ व त्याच्या पश्चिमेस गट क्र. ५९६ व गट क्र. ५९७ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५९२ च्या उत्तरेला गट क्र. ५९१ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५९१ व ५९२ च्या उत्तर-पूर्व बाजूला पंचगंगा नदी गेलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, कल्लाप्पा गाट व इतर यांनी पाईपलाईन ही गट क्र. ५९२ ते ५९६ या मिळकतीमधून केली आहे.

हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील माहिती मी माझ्या वकीलांना दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा पॅरा कलम ३ मधील वरील ३ लाईनमधील मजकूर "अशी ------- मारलेली आहे." बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी

**नियमित दिवाणी दावा क्रं. ५३३/२०१२**
**निशाणी क्रमांक - /क सोबत**

आमच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करून पाईपलाईन केले हे दाखवण्याकरीता माझ्या तोंडी कथनां व्यतिरीक्त इतर पूरावा नाही.

हे म्हणणे खरे आहे की, दि.२२/०५/२०१५ रोजी गट क्र. ५९१ व ५९२ यांची शासकीय मोजणी झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणी नकाशामध्ये गट क्र. ५९१ मध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण करून पाईपलाईन केल्याचे नमूद केल्याचे दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणीप्रमाणे मी गट क्र. ५९२ मध्ये उत्तर पूर्व बाजूला १.७५ आर. इतके अतिक्रमण केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे अतिक्रमण काढून मागितले असता, मी प्रस्तुतचा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की, दि. २२/०५/२०१५ ची मोजणी आम्ही दिलेल्या अर्जानुसार झाली. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५९२ मधील कल्लाप्पा गाट यांना पक्षकार करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ५९२ मध्ये जी पाईपलाईन गेली आहे त्याचा प्रतिवादींशी कोणताही संबंध नाही. मी कल्लाप्पा गाट यांना अतिक्रमण काढून घेण्याकरीता कोणतीही नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर पाईपलाईन संबंधात पाटबंधारे विभाग व राज्य विद्युत मंडाळाचे सदर पाईपलाईन कोणाची आहे याची चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या अनुशंगाने कोणतेही कागद दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी व कल्लाप्पा गाट यांनी माझ्या मिळकतीमध्ये पाईपलाईन करून अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीविरूध्द खोटा दावा दाखल केला आहे, त्यामुळे प्रतिवादी यांना रक्कम रू.१०,०००/- नुकसान भरपाई तुमच्याकडून मिळणे गरजेचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हुपरी पो.स्टे. ला तक्रार केल्याचे खोटे सांगत आहे व त्या अनुशंगाने कागद देखील दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ARCHANA MANOJ GAIKWAD
Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.06.25 14:03:00 +0530

**(अर्चना एम. गायकवाड)**
**३ रे सह दिवाणी न्यायाधिशासो, क स्तर**
**इचलकरंजी, जि. कोल्हापूर**

**दि. २५/०६/२०२६**
**इचलकरंजी**